# ऑस्टिन (टेक्सास) मधील ‘ SAIVA’ बद्दल ‘काही आठवणी



**साऊथ एशियन्स इंटरनॅशनल वॉलेन्टीअर असोसिएशन**

**SAIVA** (South Asians International Volunteers' Association) - Serving the Needs of the Elderly Community in Austin) च्या संस्थापिका मराठी भाषक व्यक्ती असून त्यांचे नांव आहे **शुभदा सक्सेना**.

आम्ही दोघे (पती पत्नी) १९९६पासून ऑस्टिनला आमच्या मुलीकडे (डॉ. अंजली पारगांवकर ) अधून मधून येत असतो. जेव्हा येतो, तेव्हा ऑस्टिनमधील महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमांना जरूर उपस्थित रहातो. त्यामुळेच अनेक मराठी भाषकांशी आमच्या ओळखी झाल्या. आपुलकीने बोलणारी माणसे जोडली गेली. ह्या महाराष्ट्र मंडळामुळेच स्वामी श्री मध्वानंद (डॉ. माधव नगरकर) आम्हाला भेटले. तसेच ऑस्टिन मधील SAIVA (South Asians International Volunteers' Association) संस्थेची माहिती मिळाली. संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे येथे आयोजित कार्यक्रमांसाठी, आणि स्वयंसेवी कार्यासाठी, आमच्या सारख्या जेष्ठ नागरिकांना नेण्या-आणण्याची वाहन व्यवस्था केली जाते. SAIVA मधे स्वयंसेवक म्हणून काम करण्यांत आम्हाला मानसिक समाधान मिळते आणि वेळही सत्कारणी लागतो.

**- सुनिता आणि मनोहर पानट** (ऑस्टिन, टेक्सास)

ऑस्टिन अतिशय सुंदर शहर आहे. ऑस्टिनला मी आले ते माझ्या दोन नातींबरोबर मजेत रमण्यासाठी. तसेच येथे माझी मुलगी जावई, त्यांच्या मित्रपरिवारामधे मी सहज मिसळून गेले. माझ्या मुलीची मैत्रीण शुभदा सक्सेना ह्यांची माझी ऑस्टिनमधे ओळख झाली. त्यांनी स्थापन केलेल्या जेष्ठ नागरिकांसाठी असलेल्या SAIVA संस्थेबद्दल माहिती मिळाली. आमच्या सारख्या स्वयंसेवक- जेष्ठ नागरिकांसाठी SAIVA तर्फे वाहन व्यवस्था केल्या जाते हे महत्त्वाचे. अनेक देशांतून आलेले समवयस्क स्वयंसेवक येथे सामाजिक कार्यातून दर बुधवारी, आणि महिन्यातून दोन शनिवारी येथे येतो, भेटतो, पाककृती शिकतो, घरगुती आयुर्वेदिक औषधांबद्दल एकमेकींना माहिती देतो, लोकरीच्या शाली विणतो, येथील विद्यापीठातील १५०-२०० भारतीय विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या परिक्षेच्या काळात जेवण पुरवतो. ह्याशिवाय भारतामधे अनाथाश्रमातील मुलांना शुभेच्छा पत्रे, गोष्टी लिहून पाठवतो. एकंदर आपल्या आणि इतरांच्या आयुष्यात जमेल तेव्हढा ओलावा निर्माण करणे हा उद्देश!

SAIVA मधे आर्थिक, आरोग्यविषयक, मृत्युपत्राबद्दलचे नियम इत्यादी माहिती देखील तज्ञांच्या व्याख्यानातून आम्हाला मिळते. SAIVA मुळे स्वयंसेवी कार्याची संधी मिळाली. आणि इतरांसाठी सक्रीय मदत करण्याचा आनंद मिळतो आहे. माझ्या मते SAIVA ही संस्था आम्हा जेष्ठ नागरिकांसाठी मोलाचे कार्य करते आहे.

**- वंदना जोशी** (ऑस्टिन, टेक्सास)